**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या दुरध्वनीद्वारे चर्चा

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू मणिपूर दौऱ्यावर, भयमुक्त वातावरण कायम ठेवण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन

- सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांमधल्या भरती परीक्षांचे निकाल जाहीर करण्याची सुधारित पद्धत जारी

- अवकाळी पाऊस आणि पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी राज्याची केंद्राकडे २९ हजार कोटी रुपयांची मागणी, पुरवणी मागण्या विधानसभेत मंजूर

**आणि**

- अरुणाचल प्रदेशमध्ये रस्ते अपघातात १४ मजूर ठार, ७ जण बेपत्ता, केंद्र सरकारकडून आर्थिक मदत जाहीर

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी दुरध्वनीवरुन चर्चा केली. द्विपक्षीय संबंधातली प्रगती, प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय विकासाच्या मुद्द्यावर यावेळी चर्चा झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. जागतिक शांतता, स्थैर्य आणि संपन्नतेसाठी दोन्ही देश कार्यरत राहणार असल्याचही ते म्हणाले.

दरम्यान ट्रम्प यांनी जलद गती गोल्ड कार्ड व्हिसा योजनेची सुरुवात केली आहे. यानुसार परदेशी नागरिकांना किमान दहा लाख डॉलर्समध्ये अमेरिकेत कायमचं वास्तव्य करण्याचा आणि नागरिकत्व मिळवण्याचा मार्ग खुला झाला आहे.

**<><><><><>**

मणिपूरमधल्यावांशिक हिंसाचारामुळे मणिपुरी जनतेला होणाऱ्या वेदनांची जाणीव मला असून राज्याची एकात्मता अबाधित राखून भयमुक्त वातावरण तयार करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. राष्ट्रपती सध्या मणिपूरच्या दौऱ्यावर असून आज त्या इंफाळ इथे एका कार्यक्रमात बोलत होत्या. हिंसाचाराचा बळी ठरलेल्या प्रत्येक कुटुंबाच्यामागे सरकार ठामपणे उभं आहे, असं त्या म्हणाल्या. मणिपुरच्या खोऱ्यातल्या तसेच डोंगराळ भागातल्या सर्व समुदायांनी एकत्र येऊन राज्याच्या समृद्धीसाठी काम करण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

<><><><><>

युरोपीय महासंघाशी भारताचा मुक्त व्यापार करार अंतिम करण्याच्या प्रक्रियेतले सर्व अडथळे लवकरच दूर होऊन करार मार्गी लागेल असा विश्वास केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी व्यक्त केला आहे. मुंबईत आयोजित इटली भारत व्यापार मंचाच्या बैठकीत ते आज बोलत होते. भारतभेटीवर आलेले इटलीचे उपप्रधानमंत्री आणि परराष्ट्रमंत्री अँटोनियो तायानी यावेळी उपस्थित होते.

दरम्यान अमेरिकेबरोबरच्या मुक्त व्यापार करारात भारताने देऊ केलेल्या सवलती अमेरिकेला मान्य असतील तर त्यांनी या करारावर लवकरात लवकर स्वाक्षरी करावी असं गोयल यांनी सुचवलं आहे. भारतानं दिलेला मसुदा आतापर्यंतचा सर्वोत्तम मसुदा असल्याचं अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी जामिसन ग्रीअर यांनी म्हटलं होत, त्यावर ते प्रतिक्रिया देत होते.

<><><><><>

सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांच्या भरती परीक्षांचे निकाल जाहीर करण्याबाबतचा सुधारित आराखडा अर्थमंत्रालयानं आज जारी केला. त्यानुसार आता सर्वात प्रथम स्टेट बँक ऑफ इंडियाच्या परीक्षांचे निकाल जाहीर होतील, त्यानंतर राष्ट्रीयीकृत बँकांचे आणि सर्वात शेवटी प्रादेशिक ग्रामीण बँकांचे निकाल

जाहीर होतील. त्याचप्रमाणे, या तिन्ही  श्रेणींमधल्या बँकांचे अधिकारी-स्तरीय परीक्षांचे निकाल सुरुवातीला जाहीर होतील, त्यानंतर लिपिक-स्तरीय परीक्षेचे निकाल जाहीर होतील, असं यात म्हटलं आहे

**<><><><><>**

यंदाच्या जानेवारी महिन्यापासून रेल्वे आरक्षणासाठी वापरलेली ३ कोटी पेक्षा जास्त बनावट वापरकर्त्यांची खाती निष्क्रिय करण्यात आल्याचं केंद्र सरकारनं म्हटलं आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात ही माहिती दिली.

**<><><><><>**

वंदे मातरम या गीताबद्दलच्या चर्चेचा समारोप राज्यसभेचे सभागृह नेते जे. पी. नड्डा यांनी आज केला. वंदे मातरम हा देशाचा आत्मा जागृत करणारा मंत्र असून आपल्या परंपरांशी तो आपल्याला जोडून ठेवतो, असं प्रतिपादन त्यांनी केलं.

**होल्ड… बाईट- जे. पी. नड्डा (२७ सेकंद)**

स्वातंत्र्यसंग्राम न पाहिलेल्या आजच्या तरुण पिढीला या चर्चेद्वारे याबाबत सखोल माहिती मिळेल आणि भविष्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

देशात सहा राज्यांमध्ये सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाला निवडणूक आयोगानं ३ ते १५ दिवसांची मुदतवाढ दिली आहे. तमिळनाडू, गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड, उत्तर प्रदेश, अंदमान आणि निकोबारमध्ये ही प्रक्रीया सुरू आहे. जुन्या वेळापत्रकानुसार आज पुनरीक्षणाची प्रक्रीया पूर्ण होईल, १६ तारखेला सुधारित मतदार यादी प्रसिद्ध होणार होती.

**<><><><><>**

राज्यातल्या अवकाळी पाऊस आणि पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी केंद्राकडे २९ हजार कोटी रुपयांची मदत मागितली आहे. राज्य सरकारनं आतापर्यंत ४४ हजार

कोटी रुपये दिले आहेत, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत दिली. केंद्राची मदत लवकरच मिळण्याची आशा असून दुसरं पाहणी पथक येत्या आठवड्यात येण्याची शक्यता असल्याचं ते म्हणाले. पुरवणी मागण्यांवरच्या चर्चेला ते उत्तर देत होते. यानंतर सुमारे 75 हजार कोटींच्या पुरवणी मागण्या विधानसभेत मंजूर झाल्या.

**<><><><><>**

मुंबईतल्या सुमारे २० हजार इमारतींना नियमित करण्यासाठी 'सुधारीत भोगवटा अभय योजना' लागू करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत केली. गेली अनेक वर्ष ओसी, म्हणजेच भोगवटापत्रापासून वंचित असलेल्या दहा लाखांपेक्षा जास्त मुंबईकरांना यामुळे दिलासा मिळणार आहे.

**‘होल्ड बाईट’ (२८ सेकंद)**

मुंबईच्या धर्तीवर राज्यातल्या अन्य महापालिकांमध्ये देखील  या धोरणाची अंमलबजावणी करण्याची शासनाची योजना असून याबाबत सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना नगरविकास विभागाला देण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

मुंबई शहराला पागडीमुक्त करण्यासाठी तसंच पागडी इमारतींचा न्याय्य पुनर्विकास करण्यासाठी शासन स्वतंत्र नियमावली करणार असल्याची घोषणाही त्यांनी आज केली. यामध्ये भाडेकरू आणि घरमालकांचा हक्क अबाधित ठेवला जाईल, असं ते यावेळी म्हणाले.

कापड गिरण्यांच्या जमिनींवरील जुन्या चाळींच्या पुनर्विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी नियमावलीमध्ये फेरबदल करण्याचा निर्णय झाल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

अरुणाचल प्रदेशातल्या अंजाव जिल्ह्यात एक डंपर हजार फूट खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातात १४ जण ठार आणि ७ जण बेपत्ता झाले आहेत, तर १ जण

बचावला आहे. हे सर्व बांधकाम मजूर आसाममधल्या तिनसुकिया जिल्ह्यातले असून ते गेल्या सोमवारी कामाच्या ठिकाणी जात असताना हा अपघात झाला. ही घटना अत्यंत दुर्गम भागात घडली.

त्यामुळे या दुर्घटनेबाबत उशिरा माहिती मिळाल्याचं तिनसुकियाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं. आतपर्यंत १४ मृतदेह सापडले असून इतर ७ जणांचा शोध सुरु आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही या अपघाताबद्दल शोक व्यक्त केला असून प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येक मृताच्या कुटुंबीयांना २ लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपये मदतीची घोषणा केली आहे.

**<><><><><>**

विमान उड्डाण रद्द झालेल्या प्रवाशांना इंडिगो कंपनी १० हजार रुपयांचे प्रवासाचं कुपन देणार आहे. या कुपनचा वापर वर्षभराच्या आत इंडिगोचे तिकीट आरक्षित करण्यासाठी करता येईल. ३ ते ५ डिसेंबरच्या दरम्यान उड्डाण रद्द झालेल्या, विमानतळावर अडकून पडलेल्या प्रवाशांना ही कुपन दिली जातील, असं कंपनीनं पत्रक काढून स्पष्ट केलंय.

याशिवाय उड्डाणाला २४ तासापेक्षा कमी वेळ शिल्लक असताना उड्डाण रद्द झालेल्या विमान प्रवाशांना ५ ते १० हजार रुपयांची नुकसान भरपाई दिली जाणार आहे.

**<><><><><>**

बांगलादेशाचे मुख्य निवडणूक अधिकारी ए एम एम नसिरूद्दीन यांनी आज बांगलादेशाच्या १३व्या संसदीय निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर केलं. बंगलादेशात येत्या १२ फेब्रुवारीला मतदान होणार असल्याचं त्यांनी सांगितलं. ८ ऑगस्ट

२०२४ रोजी मुहम्मद युनूस यांच्या नेतृत्वात हंगामी सरकारनं देशाची सूत्र स्वीकारल्या नंतर पहिल्यांदा या निवडणुका होत आहेत.

**<><><><><>**

टाइम नियतकालिकातर्फे सर्वात प्रभावशाली व्यक्तीला देण्यात येणारा पर्सन ऑफ द इयर पुरस्कार यंदा कृत्रिम बुद्धिमत्तेच्या शिल्पकारांना जाहीर झाला आहे. यंदाचा विजेता ही केवळ एक व्यक्ती नसून कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास करणाऱ्या अनेकांचा समूह आहे.

**<><><><><>**

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-ट्वेंटी मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. चंदीगडमध्ये हा सामना सुरू आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या १३ षटकात २ बाद १३० धावा झाल्या होत्या. पाच सामन्यांच्या या मालिकेत भारत सध्या १-०नं आघाडीवर आहे.

**//<><><><><>//**